श्रीरामप्रसन्न.

# मोरोपंती गीतें

अथवा

# मुलींचीं गाणीं.

सीतागीत, सावित्रीगीत व रुक्मिणीगीत.

REFBK-0000283

शास्त्री देव

बुकसेलर, पुणें व मुंबई.

किंमत सहा आणे.

पुणें येथें
रावजी श्रीधर गोंधळेकर यांच्या "जगद्धितेच्छु"
छापखान्यांत गजानन चिंतामणशास्त्री देव
यांनीं छापिलें.
शके १८२७. सन १९०५.

REFBK-0000283



# मोरोपंती मुलींचीं गाणीं.

## सीतागीत.

पहिली माझी ओंवी । पहिला माझा नेमा ॥

( या चालीवर. )

यज्ञासाठीं भूमि । नांगरितां ध-
न्या ॥ सांपडली कन्या । सीता दे-
वी. ॥ १ ॥ जनकाची पुत्री । दुर्ज-
ना दुर्मिळा ॥ ती भार्या उर्मिळा ।
लक्ष्मणाची ॥ २ ॥ जनकाचा बंधु ।
होता एकनिष्ठ ॥ वयानें कनिष्ठ ।
श्रेष्ठ गुणें ॥ ३ ॥ तेणें भरतासी ।
मांडवी दुहिता ॥ दिली जी सुहि-
ता । दोहीं कुळीं ॥ ४ ॥ शत्रुघ्नाला

दिली । दुजी श्रुतकीर्ति ॥ जिची गाती कीर्ति । पतिव्रता ॥ ५ ॥ चवघी वहिणी । भाग्यें झाल्या जावा ॥ त्यांचा गीतीं गावा । सुसंवाद ॥ ६ ॥ वनवासवृत्त । सीतेसी पुसती ॥ प्रेमें त्या सुसती । तिघीजणी ॥ ७ ॥ सीता ह्मणे ऐका । वनवासकथा ॥ परी मनीं व्यथा । न धरावी ॥ ८ ॥ चित्रकूटाहूनी । पादुका घेऊनि ॥ वियोग देऊनि । तुम्ही आलां ॥ ९ ॥ आह्मीही तेथूनि । तशींच निघालों ॥ वनांत रिघालों । तिघेंजणें ॥ १० ॥ लक्ष्मण भावोजी । मागें पुढें स्वा-

मी ॥ मज आहें धामीं । ऐसें वाटे ॥ ॥ ११ ॥ न बाधेचि मज । उष्ण, क्षुधा, तृषा ॥ तुम्हांपाशीं मृषा । न बोलावें ॥ १२ ॥ जेव्हां कांहीं वाटे । चालतां मी मार्गे ॥ मुरडोनि मागें । विलोकिती ॥ १३ ॥ बाई काय सांगों । स्वामींची ती दृष्टि ॥ अमृताची वृष्टि । मज होय ॥ १४ ॥ अत्रीच्या आश्रमीं । नेलें मज वाटे ॥ माहेरचि वाटे । खरेंखुरें ॥ १५ ॥ अनुसूया सती । करी वेणीफणी ॥ आनंदाची धणी । दिली मज ॥ ॥ १६ ॥ आजवरी ओली । चंदना-

ची उटी ॥ आली नाहीं तुटी । मा-
ळागुणीं ॥ १७ ॥ ऋषींतें वंदीत ।
गेलों गोदातटीं ॥ जेथें पंचवटी ।
पुण्यस्थान ॥ १८ ॥ भावोजींनीं
केली । माझी बहु सेवा ॥ ती त्या
महादेवा । ठावी असे ॥ १९ ॥
तेथें शूर्पणखी । भार्या व्हाया आ-
ली ॥ तिला माझी म्याली । चित्त
वृत्ति ॥ २० ॥ भावोजींनीं तिचा ।
कर्ण–नासा–छेद ॥ केला कीं ते
वेद- । शास्त्रार्थज्ञ ॥ २१ ॥
तिचा भाऊ खर । होऊनियां क्रुद्ध ।
करावया युद्ध । आला बाई ॥२२॥

चवदा सहस्त्र । राक्षस पापिष्ठ । रणीं केले पिष्ठ ॥ स्वामींनीं ते ॥ ॥ २३ ॥ तिणें घ्राणरक्तें । मुख मळविलें ॥ वृत्त कळविलें । रावणाशीं ॥ २४ ॥ छळाचा उपाय । मनीं आठविला ॥ दुष्टें पाठविला । मायामृग ॥ २५ ॥ स्वर्णरत्नमय । मृग म्यां देखिला ॥ तो सत्य लेखिला । मनामध्यें ॥ २६ ॥ गुहा आणावया । मागें हरिणा मी ॥ दुःख परिणामीं । नेणोनियां ॥ २७ ॥ मज रक्षावया । लक्ष्मणा ठेवूनि ॥ निघाले घेऊनि । धनुर्बाण ॥२८॥ मा-

या मृगामागें । जगदेकशूर ॥ गेले बहु दूर । अरण्यांत ॥ २९ ॥ कपटी राक्षस । जाणोनियां प्राण ॥ घ्यावयासी बाण । मोकलिला ॥ ३० ॥ तो बाण लागतां । हृदय विदारी ॥ दुष्ट हांक मारी । स्वामीवाणी ॥ ३१ ॥ हा सीते! हा बंधो । लक्ष्मणा! ये धांवें ॥ अंतकाळीं पावें । भेटावया ॥ ३२ ॥ मज वाटे माझ्या । स्वामींचीच हांक ॥ शिरे कंप धाक । हृदयांत ॥ ३३ ॥ मी म्हणे भावोजी । धावा रक्षा प्राण ॥ हे घ्या चापबाण । उठा वेगीं ॥ ३४ ॥ भावोजी ह्मणती । रा-

क्षसाची माया । कोण रामराया ।
पाहों शके ॥ ३५ ॥ वाटलें तें वा-
क्य । सत्य परी खोटें ॥ झालें दुः
ख मोठें । माझ्या मनीं ॥ ३६ ॥
न वदावें तेंचि । बोलिल्यें मी को-
पें ॥ चित्त शब्दरोपें । विदारिलें ३७
वांछितोसी दुष्टा । अग्रजाचा घा-
त ॥ माझ्या अंगा हात । लावा-
वया ॥ ३८ ॥ हात लावितांचि ।
सोडीन मी प्राण ॥ शिरीं पादत्रा-
ण । कोण वाहे ॥ ३९ ॥ माझ्या
दृष्टीपुढें । नको राहों जाच ॥ नर-
कींचा जाच मूर्त तूंचि ॥ ४० ॥

ऐशी बाई माझी। ऐकतांचि वाणी ॥
डोळां आलें पाणी। भावोजींच्या ४१
मातेनें दापितां। वत्स पित्याकडे ॥
जाय तैसें घडे। लक्ष्मणासी ॥४२॥
साधूसी गांजितां। झालें मध्यां फ-
ळ ॥ सज्जनाचा छळ। करूं न-
ये ॥ ४३ ॥ वाटेंत धनुष्यें। ओ-
ढोनियां रेघ ॥ गेले श्यामेघ। स्वा-
मीकडे ॥ ४४ ॥ तों आला रावण।
होवोनि संन्यासी ॥ न कळे अ-
न्यासी। छद्म त्याचें ॥ ४५ ॥ भि-
क्षा द्याया गेल्यें। रेघेच्या बाहेर ॥
सासर माहेर बुडवाया ॥ ४६ ॥

न लंघितें जरी । धनुष्याची रेखा ॥
तरी त्याचा लेखा । काय होता ४७
रेघेच्या बाहेरी । जसा दिला पाय ॥
झाला महाकाय । दशमुख ॥ ४८ ॥
जसा हरिणीतें । हरितो लांडगा ॥
तसा तो दांडगा । हरी मातें ॥४९॥
त्या पाप्याच्या स्पर्शें । देह हा को-
मेला ॥ आकाशीं तो मेला । रथीं
चढे ॥ ५० ॥ हा राम ! लक्ष्मण! ।
ऐशी हांक माझी ॥ जटायु मामा-
जी । आयकती ॥ ५१ ॥ सखे द-
शरथ । मामाजींचे आस ॥ सोड-
वाया भास । झाले दैवें ॥ ५२ ॥

जातीचे ते गृध्र । वृद्ध मोठे शूर ॥
रथ केला चूर । रावणाचा ॥ ५३ ॥
चंचुनखायुध । गृध्र युद्धदक्ष ॥
रावणाचें वक्ष । विदारिती ॥ ५४ ॥
अन्यायें रावण । छेदी त्यांचे पक्ष ॥
मज वाटे लक्ष । बंधुघात ॥ ५५ ॥
मूर्छित मामाजी । पडले भूवरी ॥
स्कंधीं वाहे अरि । मला बाई ५६
रडतां काढिले । पांच सात नग ॥
वस्त्रखंडीं मग । बांधिले म्यां ५७
पर्वतीं वानर । देखिले म्यां मग ॥
त्यांमध्यें ते नग । सोडियेले ॥५८॥
शत-गांवें सिंधु । त्यांत एक लंका ॥

तेथें ने कलंका । लावावया ॥५९॥
नेऊनियां ठेवी । अशोक वनांत ॥
न शोक मनांत । माये माझ्या ६०
सहस्र राक्षसी । करिती रक्षण ॥
चिंतातीर क्षण । न सांपडे ॥ ६१ ॥
दिव्यान्नाचा ज्यांत । नानापरी
थाट ॥ धाडी नित्य ताट ।
शक्रभार्या ॥ ६२ ॥ दिव्यान्नाचें
ताट । ये मज जवळ ॥ भक्षीं
मी कवळ । एक दोन ॥ ६३ ॥
फिरले घेऊनि । मारीचाचे प्राण ॥
दिव्यधनुर्बाण- । पाणी मागें ॥६४॥
मार्गी लक्ष्मणजी । करिती वंदन ॥

श्रीरघुनंदन । चरणांतें ॥ ६५ ॥
ह्मणती वत्सा त्वां । कां आज्ञा
मोडिली ॥ एकली सोडिली । कां
ती वनीं ॥ ६६ ॥ भावोजीनीं स-
र्व । वृत्त कळविलें ॥ मुख मळविलें।
अश्रुपातें ॥ ६७ ॥ ऐकोनि बोलिले ।
स्वामी झालें खोटें ॥ राक्षसांनीं
मोठें । विघ्न केलें ॥ ६८ ॥ दोघां-
च्या हृदयीं । धडधड करी ॥ आले
झडकरी । धांवोनियां ॥ ६९ ॥ पर्ण
शाळेमध्यें । देखिले कावळे ॥ स्वा-
मींचा मावळे । धैर्यसूर्य ॥ ७० ॥
केला आधीं फार । शोध मग शो-

क ॥ धन जातां लोक । करी जैसा ॥ ७१ ॥ शोधितां वनांत । मामाजी पाहिले ॥ धरूनि राहिले । कंठीं प्राण ॥७२॥ पुसती बापाजी । झाली हे कां गति । मामाजी सांगती । अर्धशब्दें ॥ ७३ ॥ स्वामींपाशीं माझें ॥ सांगतां हरण ॥ पावले मरण । शोकभरें ॥ ७४ ॥ हा तात हा तात ! । ह्मणूनि रडले ॥ मूर्छित पडले । घडीभरी ॥ ७५ ॥ मामाजींची सांग । संपादिली क्रिया ॥ त्या काळीं हे प्रिया । नाठविली ॥ ॥७६॥ पुन्हां वनीं मातें । रडत शोधि-

ती॥लक्ष्मण बोधिती। नाना-यत्नें ७७
आलिंगिल्या वेली। वियोगें भ्रमले॥
शोधितां श्रमले । रात्रंदिवस ॥७८॥
वनीं कबंधानें । केला होता घात॥
चार कोस हात । लांब त्याचे ॥७९॥
धरितां खड्गांनीं । केला भुजच्छेद ॥
शाप,ताप,खेद । निवारीला॥ ८० ॥
मतंगमुनीच्या । आश्रमीं शबरी ॥
व्हाया यश बरी । युक्तिसांगे॥८१॥
हनुमंतावरी । केली अनुकंपा ॥ या-
म्रमूंनीं पंपा । सरोवरीं ॥ ८२ ॥ सु-
ग्रीवासीं भेटी । ऋष्यमूकीं झाली॥
त्याची दृष्टि घाली । पाहतांचि॥८३॥

त्याच्या मुखें वृत्त । आयकिलें म-
ग ॥ आणूनि ते नग । दाखविले ॥
॥ ८४ ॥ सुग्रीव वानर । सूर्याचा
तनय ॥ ज्या स्वर्मीं अनय । नाहीं
हीं ठावा ॥ ८५ ॥ दोषाविणें रागें ।
सुग्रीवासी जाची ॥ त्याच्या अग्र-
जाची । बुद्धि खोटी ॥८६॥ बंधूची
स्त्री वाळी । बळात्कारें भोगी ॥ सु-
ग्रीव तो जोगी । केला होता ॥८७॥
एके बाणें वाळी । स्वामींनीं मारि-
ला ॥ सुग्रीव तारिला । संकटांत ॥
॥८८॥वानरांचें राज्य । दिलें सुग्रीवा-
ला ॥ तो फार निवाला । उपकारें॥८९॥

माझी वार्ता कोणा । न कळे किं-
मपि ॥ पाठविले कपि । शोधाव-
या ॥ १० ॥ न लागतां माझा ।
शोध कपि सारे ॥ ह्मणती ते हा
रे । दूरदृष्टा ॥ ११ ॥ मारील सु-
ग्रीव । लंघिला अवधि ॥ मरावें
नवधी । करूं नये ॥ १२ ॥ स-
मुद्राच्या तीरीं । पर्वतीं रडले ॥ म-
राया पडले । उपोषित ॥ १३ ॥ धि-
क्कार आह्मांला । झालों सेवाचोर ।
व्यर्थ मृत्यु थोर । खेद वाटे ॥ १४ ॥
श्रीरामाची भार्या । सोडवितां मे-
ला ॥ जटायू तो गेला । सद्गती-

सी ॥ ९५ ॥ ऐसें जी बोलिले । वाणी दे कंपा ती ॥ विचारी संपाति । गृध्रराज ॥ ९६ ॥ वार्ता वाटे कानीं । पडतां शंपा ती ॥ रडला संपाति । बंधुशोकें ॥ ९७ ॥ त्यानें सांगितली । त्यांना माझी शुद्धि ॥ त्या कवीची बुद्धि । समदृष्टि ॥ ९८ ॥ शतगावें बाई । मारुति उडाला ॥ पुण्यें न बुडाला । सागरांत ॥ ९९ ॥ पुरी शोधी होय । सशोक मनांत ॥ अशोकवनांत । मग आला ॥ १०० ॥ तों रात्रीं रावण । प्राथीं बडबडे ॥ बु-

द्धि गडबडे । मारुतीची ॥ १०१ ॥
पाण्यापरीस मीं । पातळ तो केला ॥
मग रागें मेला । असें ह्मणे ॥१०२
दों मासांत मान्य। न होता हे मा-
रा ॥ राक्षसी हो चारा । मांस म-
ज ॥ १०३ ॥ ऐसें राक्षसींला । सां-
गोनि तो जाय ॥ ह्मणे हाय हाय ।
हनुमंत ॥ १०४ ॥ हळूच मारुति
सद्गुणसमुद्रा ॥ वर्णी मग मुद्रा ।
मज दावी ॥ १०५ ॥ निववी हृद-
य । प्रियसखी मुद्रा ॥ काय सुधा
क्षुद्रा । निववील ॥ १०६ ॥ मज
ह्मणे चाल । बैस माझे स्कंधीं ॥

तूं दुर्गी मी बंदी। दास तुझा १०७
तेव्हां मी बोलिल्यें। नेशील बा
खरें ॥ परी नव्हे बरें। असें जा-
णें ॥ १०८ ॥ युद्धीं मारितील। या
मेल्यासी स्वामी। तेव्हां मुख बा
मी। दाखवीन ॥१०९॥ मग तें अ-
शोक। वन कपि मोडी॥ राक्षसां-
चें झोडी। बळें सैन्य ॥ ११० ॥
मारिला संगरीं। रावणाचा अक्ष ॥
कुमार जो दक्ष। रण रंगीं ॥१११॥
इंद्रजिताला तो। दाटुनि सांपडे ॥
हनुमंत पडे। ब्रह्मपाशीं ॥ ११२ ॥
रावणें वानर। मानूनियां तुच्छ ॥

पेटविलें पुच्छ । जाळावया ॥११३॥
पुच्छ पेटतांचि । हनुमंत उडे ॥
लंकेमध्यें हूडे । वाडे जाळी॥११४॥
देवांनीं वदनीं । घातली आंगोळी ॥
लंकेची रांगोळी । पाहोनियां॥११५॥
विचारोनि मज । जाय स्वामींकडे ॥
पायांवरी पडे । हनुमंत ॥ ११६ ॥
माझा समाचार । ऐकोनि हर्षले ॥
प्रेमाश्रु वर्षले । स्वामी माझे ॥११७॥
स्वामींस महृत्त । करी सुप्रसन्न ॥
जैसें दिव्य अन्न । क्षुधार्ताला ११८
हनुमंतावरी । झाली दया मोठी ॥
उपकार कोटि । मानियेले ॥११९॥

निघाले घेऊनि । वानरांची सेना ॥
धरणीं दिसेना । सूर्यप्रभा ॥ १२० ॥
रावण धर्माच्या । वाटे न लागला ॥
सांगोनि भागला । बिभीषण १२१
नायके रावण । क्रोधानळें पेटे ॥
श्रीमंतासी भेटे । सिंधुतटीं ॥१२२॥
ह्मणे गुणकल्पवृक्षांच्या अरण्या ॥
दयाळा शरण्या । रक्षीं मज ॥१२३॥
स्वामीचें शरणा- । गतीं प्रेम प्राज्य ॥
दिलें लंकाराज्य । वंदितांचि ॥१२४॥
भेटला सागर । जोडोनिया करा ॥
म्हणे सेतु करा । तारा मज १२५
शत गांवें सेतु । समुद्रीं रचिला ॥

पर्वतीं खचिला । मार्ग मोठा १२६
सेतु-पंथें सिंधु । लंघूनियां आले ॥
वार्तामृतें धाले। कर्ण माझे ॥१२७॥
दूत पाठविला । दुर्जनभंगद ॥ ते-
जस्वी अंगद । वालिपुत्र ॥ १२८ ॥
स्वामींचा निरोप । दोहीं लोकीं
पथ्य ॥ सांगितला तथ्य । अंगदानें ॥ १२९ ॥ खळ नेघे वाक्य ।
स्वामींचें तोखद ॥ न सेवी ओखद । गतायुष्य ॥ १३० ॥ म्हणे
आह्मांपुढें । बोलतें वांकडें ॥ मर्यादा माकडें । टाकिली कीं ॥१३१॥
राक्षस हो धरा। मारा धांवा चावा ॥

पळ न वांचवा । हा मर्कट ॥१३२॥
अंगासी राक्षस । झोंबले चवघे ॥
झाडोनि अवघे । पिष्ट केले ॥१३३॥
उडतां मोडिली । स्वर्णवज्र सभा ॥
मळविली प्रभा । रावणाची ॥१३४॥
धर्ममर्यादेच्या । संकोचें थोपले ॥ अ-
धर्में कोपले । राक्षसाच्या ॥ १३५ ॥
ज्यांला चावावया । वज्राहूनि गा-
ढा ॥ काळाच्याही दाढा । न श-
कल्या ॥ १३६ ॥ ते राक्षस लक्ष ।
कोटी बळ-पूर्ण ॥ वानरांनीं चूर्ण ।
नखीं केले ॥ १३७ ॥ रक्तनद्या ते-
थें । शतशा वाहिल्या ॥ देवांनीं पा-

हिल्या । डोळेभर ॥ १३८ ॥ मारि-
ले प्रधान । रावणाचे पोर ॥ त्यांत
बळी थोर । इंद्रजित ॥१३९॥ रा-
वणाचा भ्राता । कुंभकर्ण काळ ॥ ते-
णें कपिपाळ । धरियेला ॥ १४० ॥
बहिणीची तैशी । त्याची करी गति ॥
स्वयें कपि-पति । सुटोनियां ॥ १४१॥
जसे बेरे गरे । बहु कपिभट । ते-
णें गटगट । गिळियेले ॥ १४२ ॥
पळाया त्यां वाट । मिळे कर्णी ना-
कीं ॥ मिथ्या वर्णी ना कीं । जान-
की मी ॥ १४३ ॥ प्रभूंनी हरिलें ।
तत्तेज सर्व तें ॥ नुरावें पर्वतें । व-

ज्ञापुढें ॥ १४४ ॥ माझे स्वामी झा-
ले । त्या तमा तरणी ॥ त्यांची मा-
त रणीं । काय सांगों ॥१४५॥ इं-
द्रासी असह्य । इंद्रजित परी ॥
मारिला तो अरि । भावोजींनीं ॥१४६॥
वाहूनि मस्तकें । तोषविला भर्ग ॥
कांपविला स्वर्ग । कैलासही ॥१४७॥
तो काय सामान्य । परी झाला ग-
र्व ॥ त्याचें तेज सर्व । वायां गेलें ॥
॥ १४८ ॥ मारिला प्रभूंनीं । सहप-
रिवार ॥ उतरिला भार । धरणीचा ॥
॥ १४९ ॥ उर्मिळे मूर्छित । तुझे मा-
झे धणी ॥ झाले होते रणीं । सेने-

सह ॥ १५० ॥ वांचविले सर्व । ह-
नुमंतें बाई ॥ सांगों याचे काई । उ-
पकार ॥ १५१ ॥ ओषधिपर्वत । स-
मूळ उपटिला ॥ घडींत आणिला ।
जैसा चेंडू ॥ १५२ ॥ हनुमंतें आ-
ह्मां । दिलें चुडेदान ॥ ऐसा नाहीं
आन । आस कोणी ॥ १५३ ॥ उ-
ठले वानर । अमृतवृष्टीनें ॥ स्वामी-
च्या दृष्टीनें । हेंचि सत्य ॥ १५४ ॥
शिबिकेंत मज । घालोनि आणिलें॥
देह म्यां न्हाणिलें । अग्निकुंडीं॥१५५॥
त्या काळीं देवांनीं । केली पुष्पवृ-
ष्टि ॥ आनंदानें सृष्टि । कोंदाटली ॥

॥ १५६ ॥ आले दशरथ । मामाजी विमानीं ॥ धन्या जीवीं मानी । आपणा सी ॥ १५७ ॥ देवांची प्रार्थना । मामाजींची आज्ञा ॥ घेऊनी सर्व प्राज्ञा । सुखवाया ॥ १५८ ॥ मांडीवरी मज । घेतलें स्वामींनीं ॥ घनीं सौदामिनी । जनां वाटे १५९ शृंगयुक्त पति । पुष्पकाविमानीं ॥ पुष्प कवि मानी ॥ जें बैसले ॥१६०॥ स्वामींनीं समुद्रीं । दाखविला सेतु । भवाब्धींत हेतु । तराया जो ॥१६१॥ रुंद दहा गांवें । लांब शत गांवें ॥ पाप न तगावें । जो देखतां ॥१६२॥

दाविली किष्किंधा । भेटाविली ता-
रा ॥ सुग्रीवाची दारा । जाऊ बाई
॥ १६३ ॥ स्वामींच्या सुखींच्या ।
ज्या म्यां आयकिल्या ॥ गोष्टी काय
किल्ल्या । सर्वस्वाच्या ॥ १६४॥ अ-
वधि टळेल । असें नच वदा ॥ अ-
सेन चवदा । वर्षें वनीं ॥ १६५ ॥
ऐसा भरतासीं । शत्रुघ्नाशीं बोल ॥
प्रभूंनीं तो फोल । केला नाहीं१६६
संतति संपत्ति । वाढे होय हित ॥
प्रेमें गातां गीत । श्रीरामाचें ॥१६७॥
न बाधे पर्जन्य । वात, उष्ण, शी-
त ॥ प्रेमें गातां गीत । श्रीरामाचें ॥

॥ १६८ ॥ धन्य धन्य होय । सं-
सारीं जीवित ॥ प्रेमें गातां गीत ।
श्रीरामाचें ॥ १६९ ॥ काळापासू-
निही । नव्हे चित्त भीत ॥ प्रेमें
गातां गीत । श्रीरामाचें ॥ १७० ॥
अंतीं वसे स्वर्गीं । अमृतातें पीत ॥
प्रेमें गातां गीत । श्रीरामाचें ॥ १७१ ॥
श्रीरामातें ध्यावें । श्रीरामातें गावें ॥
श्रीरामातें भावें । आठवावें ॥ १७२ ॥
रामाचें चरित । अमृत-भरित ॥ सेवा-
वें त्वरित । सर्वांनींही ॥ १७३ ॥
श्रीरामाचें गीत । गातील ज्या क-
न्या ॥ होतील त्या धन्या । संसारां-

त ॥ १७४ ॥ श्रीराम दयेचा । मे-
घ त्या समोर ॥ प्रेमें दास मोर ।
नाचताती ॥ १७५ ॥ या श्रीराम
दया- । तोयदा समोर ॥ होय दास
मोर । आनंदित ॥ १७६ ॥

## सीतागीत समाप्त.

# मोरोपंती मुलींचीं गाणीं.

## सावित्री-गीत.

पहिली माझी ओंवी । पहिला माझा नेमा ॥
या चालीवर

मद्रदेशीं होता । राजा महामति ।
नामें अश्वपति । साधु-मान्य ॥ १ ॥
आलें वृद्धपण । नाहीं पुत्ररत्न ।
केले बहु यत्न । करावे ते ॥ २ ॥
सावित्रीदेवीचें । करी आराधन ।
देह दारा धन । समर्पूनि ॥ ३ ॥
निष्ठेनें सर्वदा । अष्टादश वर्षे ।
जप होम हर्षें । चालवितां ॥ ४ ॥
अग्निकुंडांतुनि । प्रकटली देवी ।

अश्वपति ठेवी । पायीं शिर ॥ ५ ॥
देवी म्हणे माग । राजा म्हणे मा-
ते ॥ पुत्रदानें दाते । लाजवावे ६
सावित्री म्हणे त्यां । स्वामी दया-
निधि ॥ विनविला विधि । तुजसा-
ठीं ॥ ७ ॥ दिली तुज पुत्र । शता-
हुनि धन्या ॥ पतिव्रता कन्या ।
विचारूनि ॥८॥ ऐसें सांगोनि तीं ।
देवी गुप्त झाली ॥ कन्या पोटीं
आली । मालवीच्या ॥ ९ ॥ पुत्राचें
तैसेंच । विधीनें बारसें ॥ सुदिनीं
बारसें । तिचें करी ॥ १० ॥ जिणें
पूर्ण केला । वरदानें काम ॥ ठेवी

तिचें नाम । कन्यकेसी ॥ ११ ॥
रूपें गुणें कांहीं । उणी न सावि-
त्री । तशी नसावी त्रि-। भुवनांत॥१२
तिला न मागती । राजपुत्र गुणें ॥
स्वरूपासी उणें । जाणोनियां॥१३॥
राजा चिंता करी । झाली उपवर ॥
अनुरूप वर । न ये कोणी ॥१४॥
सावित्रीला ह्मणे । वत्से लग्नकाळ ॥
आला न भूपाळ । कोणी मागों॥१५
तूंचि वर स्वयें । योग्य पहा जा
गे ॥ कोणीही न मागे । येऊनियां१६
या माझ्या वचनें । तुवां न कोपा-
वें ॥ तुज ज्यां ओपावें । योग्य

हस्तीं ॥ १७ ॥ सावित्री पित्याची ॥ आज्ञा मान्य करी ॥ ठेवी पायांवरी । मस्तकातें ॥ १८ ॥ पित्याचा प्रधान । कुलगुरु दाया ॥ आससमुदाया । सह निघे ॥ १९ ॥ गेली पृथ्वीवरी । पहावया वरा ॥ करी शोध वरा । देशोदेशीं ॥२० ॥ शोधी ती मानेसा । नवरा जीवाला ॥ नव राजीवाला । जैशी भृंगी ॥ २१ ॥ रसिकाला जैशी । कविता ती सती ॥ पाहे योग्य पति । जनीं वनीं ॥ २२ ॥ एके दिवशीं आला । संसारपारद ॥ श्रीमुनि ना-

रद । मृत्यूलोकीं ॥ २३ ॥ अश्वप-
तीला तो । भेटे तपोधन ॥ चात-
काला घन । स्वयें जैसा ॥ २४ ॥
अश्वपति पावे । सुखास नमूनि ॥
सुखासन मुनि । अंगीकारी ॥२५॥
सुधारस तूपें । कीं सागर कूपें ॥ तैसा
मुनि भूपें । सत्कारिला ॥ २६ ॥
उंच्दराया अश्व । पतिराय कवि ॥
कथा आयकवी । पुरातना ॥ २७ ॥
अशा समयांत । सावित्रीही आली॥
पायीं नम्र झाली । दोघांच्याही॥२८॥
नारद विलोकी । करूनियां कृपा ॥
ह्मणे तुझी नृपा । कन्या कीं हे ॥२९।

कोठें गेली होती । कोठोनि ही आली ॥ सत्य श्रीची आली । रूपें गुणें ॥ ३० ॥ अहा उजविलें । कां न कन्यकेला ॥ ईणें धन्य केला । न कां कोणी ॥ ३१ ॥ राजा म्हणे स्वामी । हेचि भूमीवर ॥ पहावया वर । धाडिली म्यां ॥ ३२ ॥ आतांचि आली हे । सावित्री या धामीं ॥ ईचें वाक्य स्वामी । आयकावें ॥३३॥ वत्से सांग कोण वर त्वां पाहिला ॥ ऐकाया राहिला । स्वस्थ मुनि ॥ ३४ ॥ सावित्री ह्मणे हो । शाल्व देशपति ॥ द्युमत्सेन

अति । विख्यात हो ॥ ३५ ॥ धर्म-
न्यायनिष्ठ । दाता सत्यसंध ॥
झाला दैवें अंध । वृद्धपणीं ॥ ३६ ॥
आलें अंधपण । पुत्र तोही बाळ ॥
असा कष्ट काळ । प्राप्त होतां॥३७॥
शत्रूनें हरूनि । राज्यभ्रष्ट केला ॥
सस्त्रीपुत्र गेला । तपोवनीं ॥ ३८ ॥
साहोनियां वर्षा । हिमा आतपाला॥
तो महातपाला । करीतसे ॥ ३९ ॥
त्याचा पुत्र नामें । सत्यवान् सुमति॥
वरिला तो पति । भावें मनें ॥४०॥
मुनि म्हणे केलें । सावित्रीनें खोटें॥
यांत पाप मोठें । काय सांगों॥४१॥

सत्य बोलतसे । द्युमत्सेन राजा ॥
बोले त्याची भाजा । तेंही सत्य ॥४२॥
स्वयेंही तो सत्य । सर्वदा बोलतो ॥
सर्वांचि डोलतो । तपोवनीं ॥ ४३ ॥
चित्रीं लिही अश्व । मृत्तिकेचा घडी ॥
हाचि घडीघडी । छंद त्यास ॥ ४४ ॥
म्हणूनि सत्यवान् । चित्राश्व हीं
नांवें ॥ मुनींनीं स्वभावें । ठेवियेलीं
॥ ४५ ॥ आम्हां ठावें आहे । त्याचें
वृत्त सारें ॥ आमुच्या विचारें । चु-
कली हे ॥ ४६ ॥ राजा म्हणे रूपें
बरा आहे तो कीं ॥ मुनि म्हणे
लोकीं । तसा कैंचा ॥ ४७ ॥ राजा

म्हणे जाणे । विद्या कळा कांहीं ॥
मुनि म्हणे नाहीं । तैसा सुज्ञ ॥४८॥
राजा म्हणे शौर्यें । कसा असे बोला॥
मुनि म्हणे तोला । महेंद्राशीं ४९॥
राजा म्हणे आहे । गुरुविप्रभक्त ॥
मुनि ह्मणे व्यक्त । भक्तिरस ॥५०॥
राजा ह्मणे तरी । नसेल तो दाता ॥
मुनि ह्मणे ज्ञाता । त्याच्या गावें ५१
राजा म्हणे तरी । क्षमा नाहीं काय॥
मुनि ह्मणे ज्ञाय । नायकीं हें ॥५२॥
राजा ह्मणे पाहे । हरिहरा भेद ॥
तेणें तुज खेद । वाटतसे ॥ ५३ ॥
मुनि ह्मणे शिव । शिव हरिहरि ॥

त्याची फार बरी । दृष्टि आहे॥५४॥
राजा ह्मणे त्याच्या । कोण दोष
आंगा ॥ स्पर्शलासे सांगा । तुम्ही
स्वामी ॥ ५५ ॥ मुनि ह्मणे गुण ।
ग्रामा एक थोर ॥ दोष चंद्रा घोर ।
राहु जैसा ॥ ५६ ॥ त्या गुणमंद-
रा । वर्षमात्र आयु ॥ जातां काळ-
वायु । उन्मूळील ॥ ५७ ॥ राजा
म्हणे तृषा । हरी त्या सुसरा ॥ से-
वावें दुसरा । पहा बाई ॥ ५८ ॥
सावित्री म्हणे जो । वरिला मीं मनें॥
तोचि गुरुजनें । द्यावा मज ॥५९॥
तो सत्यवान् सत्य । पति हो क-

ल्पायु ॥ किंवा हो अल्पायु । अन्य
पिता ॥ ६० ॥ त्यालाचि वरील ।
तुमची हे कन्या ॥ तुह्मांसम अन्या ।
पहातसे ॥ ६१ ॥ मुनि म्हणे राया ।
स्थिरबुद्धि धन्या ॥ हे सावित्री क-
न्या । निश्चयाची ॥ ६२ ॥ सत्य-
वंता ऐसा । गुणी नाहीं कोणी ॥
पाहिली त्यां क्षोणी । विचारूनि
॥ ६३ ॥ चित्राश्वाकारणें । द्यावें क-
न्यादान ॥ कांहीं अनमान । करूं
नको ॥ ६४ ॥ धर्मे वर्ते त्याचा ।
ईश्वर कैवारी ॥ सर्वानर्थ वारी ।
धार्मिकांचे ॥ ६५ ॥ तुह्मां समस्तां-

चें । कल्याण असावें ॥ जातों मी
बसावें । स्वस्थ तुवां ॥ ६६ ॥ ऐसें
बोलोनि तो । मुनि स्वर्गा जाय ।
गेला तोही राय । तपोवना॥ ६७ ॥
द्युमत्सेना भेटे । ह्मणे अश्वपति ॥
तुझ्या पुत्राप्रती ॥ कन्या देतों॥६८॥
द्युमत्सेन म्हणे । आमुची हे गती ॥
अन्य क्षितिपति । काय थोडे ।६९॥
तुझी एकुलती । कन्या भाग्यवती ॥
सुखोचिता अति । सुकुमारी ॥ ७० ॥
नाहीं सुखगंध । राज्यभ्रष्ट अंध ॥
अशाशीं संबंध । कां रचला ॥७१॥
अश्वपति ह्मणे । सत्यशीलधन ॥

हेंचि सुज्ञ जन । इच्छितात ॥ ७२ ॥
संकटाला भिऊं । नये सत्वरें ॥
जातें सत्वर तें । सोडोनियां ॥७३॥
निश्चयें घेऊनि । आलों कन्यकेला॥
अर्थी धन्य केला । पाहिजे हो ॥
॥ ७४ ॥ द्युमत्सेन ह्मणे । अतिथी
तूं पूर्ण ॥ तुझा काम पूर्ण । करा-
वाचि ॥ ७५ ॥ पाचारिले त्यांहीं ।
सर्व तपोनिधि ॥ लग्न यथाविधि ।
संपादिलें ॥ ७६ ॥ परमार्थदृष्टि ।
हिमालयापरी ॥ कन्यादान करी ।
अश्वपती ॥ ७७ ॥ कन्या निरखि-
तां । पडे महीवर ॥ राया गहींवर।

आंवरेना ॥ ७८ ॥ सावित्री पित्या-
च्या । नेत्रांतें पदरें ॥ पुसूनि आदरें ।
समजावी ॥ ७९ ॥ घेऊनि निरोप ।
निघे अश्वपति ॥ ती सावित्री सती ।
स्वस्थ राहे ॥ ८० ॥ हर्षली पावो-
नि । जशी सती भर्गा ॥ वनाहूनि
स्वर्गा । तुच्छ मानी ॥ ८१ ॥ त-
शीच सावित्री । आनंदली मनीं ॥
क्रीडे तपोवनीं । पतीसंगें ॥ ८२ ॥
वांटी बहु स्वल्प । वस्त्र नग ठे-
वी ॥ वल्कलें ती देवी । सुखें ने-
से ॥ ८३ ॥ श्वशुराची आज्ञा ।
जशीच वेदाची । तीळही भेदा-

ची ॥ बुद्धी नाहीं ॥ ८४ ॥
कुळदेवताचि । ती श्वश्रू मानिली ॥
पूजिली वानिली । सावित्रीनें ॥८५॥
केवळ अतिथी । अभ्यागत बाळ ॥
करी प्रतिपाळ । माता सती ॥८६॥
मानियला शाक । फळमूळकंद ॥
रसाहूनि मंद । सुधारस ॥ ८७ ॥
बोलावें समित । मृदु परिमित ॥
सत्य प्रिय हित । बोलविल्या ॥ ८८ ॥
सर्वांच्या मागूनि । तृणशय्येवरी ॥
सुखें निद्रा करी । उठे आधीं ॥८९॥
एकांतीं पतीचें । हृदय रमवी ॥ सं-
ताप शमवी । सेवाधर्मैं ॥ ९० ॥ न-

घडे विसर । मुनीच्या शब्दाचा ॥
अवधि अब्दाचा । सदा मोजी॥११॥
जसा तो अवधि ॥ होय देह उणा।
नित्य ताप दुणा । सावित्रीचा॥१२॥
उरले दिवस । अवधीचे चार ॥ व्र-
ताचा विचार । करी मधीं ॥१३॥ उ-
पोषण तीन । दिवस करावें ॥ शे-
वटीं मरावें । पतीसह ॥ १४ ॥ त्रि-
दिन व्रताचा । संकल्प करूनि ॥
बैसली धरूनि । नियमातें॥ १५ ॥
दुःख पावे राजा । तिच्या त्या नि-
श्चयें ॥ आहारार्थ स्वयें । असें प्रा-
र्थी ॥ १६ ॥ ह्मणे बाई मज । अं-

धाकडे पाहें ॥ उपोषण कां हें । आ-
रंभिलें ॥ ९७ ॥ मुली हा उपास ।
तिसरा कीं आहा । कां हे कष्ट
महा । करितेस ॥ ९८ ॥ गुर्वाज्ञा
पालन । व्रत कुलीनेतें ॥ बाई मु-
ली नेतें । सुखें स्वर्गा ॥ ९९ ॥
सावित्री ह्मणे जी । नका होऊं
श्रमी ॥ उद्यां व्रतास मी । उजवी-
न ॥ १०० ॥ कळेल करितें । व्रत
उद्याकारणें ॥ करीन पारणें । उद्यां
याचें ॥ १०१ ॥ राजा ह्मणे तरी ।
घडो हें अव्यंग ॥ कोणीं व्रतभं-
ग । करूं नये ॥ १०२ ॥ न भो-

गितां अशी । संतापतीव्रता ॥ सं-
तां पतिव्रता । सदा मान्या ॥१०३॥
ऐसें सांगोनियां । हित उगा राहे॥
राजा वाट पाहे । उदयाची ॥१०४॥
चवथे दिवशीं । प्रातःकाळीं सती ॥
समाप्त व्रत ती । करी भावें ॥१०५॥
नमस्कारी श्वश्रू । श्वशुरचरणां ॥
पतीच्या मरणा । चुकवाया ॥१०६॥
ह्मणती सौभाग्य- । वती पुत्रवती ॥
चिरकाळ पती- । सह नांदें ॥१०७॥
ऐसेंच ह्मणती । तपोधन मुनि ॥ मा-
गतां नमूनि । आशीर्वाद ॥१०७ ॥
आशीर्वादवर । गुरूंचे साधिले ॥

पदरीं बांधिले । सावित्रीनें ॥ १०९ ॥
आली तपोधना । करूनि प्रणति ॥
वडील ह्मणती । भुक्ति करीं ॥११०॥
विनवी जोडूनि । हात त्याकारणें ॥
करीन पारणें । अस्तमानीं ॥ १११ ॥
मनींच सावित्री । वाहे काळजीला ॥
दिसे काळ जिला । क्षणक्षणां ॥११२॥
सत्यवंत स्कंधीं । परशु वाहोनि ॥
स्त्रीकडे पाहोनि । वना निघे ॥११३॥
सावित्री ह्मणे जी । मी येत्यें वना-
ला ॥ वियोग मनाला । न सोसवे ॥
॥ ११४ ॥ तो ह्मणे त्वां केलीं ।
उपोषणें तीन ॥ झाला शक्तिहीन

देह तुझा ॥ ११५ ॥ वर्णावीं पाउलें । तुझीं नवनीतें ॥ गमन वनीं तें । कठिनांचें ॥ ११६ ॥ सुखद नव्हे तें । दुःखद कानन ॥ ह्मणसी कां न न । आतां येतां ॥ ॥ ११७ ॥ सती ह्मणे, मज । दुःखांतचि सुख ॥ तुमचें श्रीमुख । विलोकितां ॥ १८ ॥ स्वामीसंगें मज । न बाधेल ताप ॥ जसा भवताप । संतसंगें ॥ १९ ॥ सत्यवंत ह्मणे । कांते न रुसावें ॥ तुवां हें पुसावें । वडिलांस ॥१२०॥ सासूसासऱ्यांतें । ह्मणे न कोपावें ॥ मज हें ओपावें ।

वरदान ॥ १२१ ॥ फळें आणावया ।
जातांना वनांत ॥ माझ्याही मनांत ।
वाटे जावें ॥ १२१ ॥ वर्ष झालें
आल्या । सोडुनि माहेर ॥ आश्रमा-
बाहेर । गेल्यें नाहीं ॥ १२३ ॥ स्वा-
मीसमागमें । तपस्वी शरण्य ॥ पाहीं-
न अरण्य । आज्ञा द्यावी ॥ १२४ ॥
राजा म्हणे बाई । वर्षांत त्वां
कांहीं ॥ मागितलें नाहीं । आम्हां-
पाशीं ॥ १२५ ॥ वन पाहावया ।
आज्ञा मागतीस । पायां लागतीस ॥
तरी जावें ॥ १२६ ॥ वत्सा उप-
वासी । सुकुमारी बाळा ॥ शीघ्र या

सांभाळा । अन्योन्यातें ॥ १५७ ॥
वंदूनियां सती । निघे झडकरी ॥
धैर्य धड करी । हृदयातें ॥ १२८ ॥
पुष्पित फलित । तरु मृग पक्षी ॥
वनांतरीं लक्षी । राजकन्या ॥१२९॥
पतीच्या सुखार्थ । बळें आणी हा-
स्य॥मयूराचें लास्य। विलोकूनि १३०
विनोद वचनें । पतीतें डोलवी ॥
दाटुनि बोलवी । पुण्यकथा ॥१३१॥
एके नेत्रें प्रिया । एके नेत्रें काळा ॥
पाहे राजबाळा । हृष्टा भीता १३२
चित्राश्व वेंचूनि । फळें पात्र भरी ॥
मग काष्ठावरी । धाव घाली॥१३३॥

शक्तीहून बहु । घडतां आयास ॥
तयाच्या कायास । घर्म आला १३४
कठिणा काष्ठाच्या । करितां भेदना ॥
उठली वेदना । शिरीं भारी ॥१३५॥
ह्मणे प्रिये शूळ । उठला मस्तकीं ॥
धांवुनि हस्तकीं । साध्वी धरी १३६
ह्मणे कधीं झाला । ऐसा खेद ना-
हीं ॥ शिरोवेदनाहीं । धैर्य गेलें १३७
जाणों शूलाघातें । मस्तक फाटतें ॥
मनांत वाटतें । निजावेंसें ॥ १३८ ॥
पतीच्या मस्तका । खालीं घाली मां-
डी ॥ जाणों उशी मांडी । कुसमाची ॥
धरूनि मस्तक । मनीं ह्मणे बाळा ॥

आला ठोकताळा । भविष्याचा १४०
तों पुरुष पाशहस्त । उभा आहे ॥
असें साध्वी पाहे । पुण्यबळें ॥१४१॥
रक्त नेत्र कृष्ण । वर्ण तेजें अर्क ॥
काळ असा तर्क । मनीं केला १४२
हळुचि मस्तक । उतरूनि ठेवी ॥
उठोनि ती देवी । हात जोडी १४३
ह्मणे बा तूं देव । काय तुझें नाम ॥
कोण कार्य काम । मज सांग १४४
काळ ह्मणे शुद्धा । ह्मणोनिच तुज ॥
सांगतों मी गूज । पतिव्रते ॥१४५॥
करीता जीवाची । प्राणहानि यम ॥
जाण हा नियम । व्रतसिद्धे ॥१४६॥

सरलें आयुष्य । नियत मान्या या ॥
प्रियतमा न्याया । तुझ्या आलों॥४७॥
पतिव्रता म्हणे । दूत कीं येतात ॥
जीवाला नेतात । तुजकडे ॥१४८॥
स्वयें कां आलास । काय केले दूत ॥
प्रभूस प्रभूत । श्रम झाला ॥ १४९ ॥
यम म्हणे पितृ- । भक्त सत्यवंत ॥
यासी सर्व संत । मानवती ॥१५०॥
कोणी रूपें गुणें । नाहीं असा मा-
न्य॥सत्य असामान्य। सत्यवंत॥१५१॥
दूत कसा धाडूं । न्यावया अशाला॥
रक्षाया यशाला । स्वयें आलों १५२
ऐसें बोलोनियां । तो देव कीनाश ॥

घालोनियां पाश । बळें ओढी १५३
पुरुषासी राजा । काढी गेहांतूनि ॥
तसा देहांतूनि । काढियेला ॥१५४॥
पुरुष काढितां । अंगुष्ठ प्रमाण ॥
निष्प्रभ निष्प्राण । देह झाला १५५
पाशांनीं बांधोनि । सूक्ष्म पुरुषाला ॥
घेउनी निघाला । धर्मराज ॥ १५६ ॥
यापरि होउनी । कृतकार्य काळ ॥
निघाला तत्काळ । दक्षिणेला १५७
त्यामागूनि साध्वी । तशीच निघा-
ली ॥ न तिच्या निगाली । मनीं
शंका ॥ १५७ ॥ सतीव्रतें तिच्या ।
अंगा सिद्धी आली ॥ आकाशांत झा-

ली । गति प्राप्त ॥१५९॥करी मनुष्य-
त्वा । पासूनि सुटका ॥ जड ही
गुटका । न कां धर्म ॥ १६० ॥ य-
म म्हणे दूर । पायींच आलीस ॥
सावित्री झालीस । उतराई॥ १६१ ॥
जा उत्तम लोक । प्राप्त व्हाया प्रि-
या ॥ करी सांग क्रिया । यथाश-
क्ति ॥ १६२ ॥ सावित्री म्हणे गा ।
देहासवें छाया ॥ जशी तशी जा-
या । पतीसवें ॥ १६३ ॥ प्राण जा-
ऊं द्यावे । पति न सोडावा ॥ स्वधर्म
जोडावा । मुख्य हाचि ॥ १६४ ॥
गुरूंच्या तुझ्याही॥ प्रसादें आजी या॥

गतीला माझिया । विघ्न नाहीं॥१६५॥
सात पदें गांठीं । जरी मार्गीं पडे ॥
तरी मैत्री घडे । सज्जनांशीं ॥ १६६॥
या न्यायें तूजशीं । सख्य झालें वा-
टे ॥ दोघें एके वाटें । चालतसों १६७
तुजशीं बोळत्यें। कांहीं मित्रभावें ॥
तें त्वां आयकावें । धर्मराजा ॥१६८॥
इंद्रियें जिंकिल्या-। विना केलें कर्म ।
त्यासी संत धर्म । न म्हणती॥१६९॥
गृहस्थाश्रमांत। सर्व धर्म घडे ॥ तेणें
मळ झडे । अंतरींचा ॥ १७० ॥ वि-
षयवासना । मळ जातां ज्ञान ॥
होय समाधान । आत्मलाभें ॥१७१॥

गृहस्थाला सोपें। न तसें अन्यास ॥
न लागे संन्यास। ज्ञानासाठीं ॥१७२॥
असें म्यां ऐकिलें। ऐसेंच कीं बा हें ॥
विचारूनि पाहे। धर्मराजा ॥१७३॥
धर्म ह्मणे बाई। मदालसा धन्या ॥
कीं तूं नसे अन्या। आढळली १७४
रोमांच माझिया। देहीं उभारती ॥
तुझी सुभारती। आकर्णितां ॥१७५॥
पती विना देतों। एक वर मागें ॥
जा फिरोनि मागें। भागलीस १७६
साध्वी ह्मणे देसी। जरी आज वर ॥
तरी राजवर। द्युमत्सेन ॥ १७७ ॥
त्याचें अंधपण। वृद्धपण जावें ॥

गेलें तेज यावें । अनायासें ॥१७८॥
यम ह्मणे हें भ्यां । दिलें महाभागे ॥
परतोनि जा गे । भागलीस ॥१७९॥
साध्वी ह्मणे मला । कांहीं नाहीं श्र-
म ॥ पति समागम । सुखमय ॥१८०॥
दुर्लभ सत्संग । दैवें प्राप्त झाला ॥
सत्संगानें धाला । नाहीं कोण १८१
सत्संग दीना श्री । वना दे वसंत ॥
धना देव संत । ज्ञाना देती १८२
सत्संग दुर्लभ । कामप्राप्तिहेतु ॥
सत्संग हा सेतु । भवार्णवीं ॥१८३॥
यम ह्मणे बाई । तुझी दिव्य दृष्टि ॥
अमृताची वृष्टि । तुवां केली ॥१८४॥

बोलतीस तैसें । श्रुतीनें बोलावें ॥
ऐकतां डोलावें । जडांनींही १८५
वेधील विधीला । बाई बोल तुझा ॥
पतीविना दुजा । वर मागे ॥१८६॥
पतिव्रता म्हणे । स्वराज्या आसरा ॥
हो माझा सासरा । द्युमत्सेन॥१८७॥
कोणाही निमित्तें । स्वधर्मातें जोडूं ॥
सज्जनाच्या जोडूं । प्रसादातें॥१८८॥
धर्म म्हणे दिलें । जा बाई आश्रमा ॥
त्वत्तनु या श्रमा । योग्य नव्हे १८९
सावित्री म्हणे जे । ज्ञानातें जोडिती ॥
न तयां सोडिती । तुझे पाश ॥१९०॥
नरकीं जीवास । भोगविसी ताप ॥

केलें असे पाप । ज्यांहीं जैसें १९१
त्यां पापी सर्वही । निरयास नेला ॥
यातना तयाला । भोगावया १९२
शुद्ध पुरवूनि । काम सभाजिला ॥
तामस भाजिला । कुंभी पाकीं १९३
जो द्रोह न करी । कोणाही भूताचा ॥
त्या तुझ्या दूतांचा । धाक नाहीं १९४
जो कोणी सर्वत्र । करी अनुग्रहा ॥
त्यासी अनुग्रहा । तुझा देह १९५
सर्वत्र अद्रोह । अनुग्रह दान ॥
हें त्रय निधान । कल्याणाचें १९६
संताच्या ठायीं हें । धर्मत्रय वसे ॥
इतरत्र नसे । क्षणमात्र ॥ १९७ ॥

संतासी जो आला। शत्रूही शरण ॥
तयासी मरण। न ते देती ॥१९८॥
सर्वांही संतांत। मुख्य तूं बा धर्म ॥
तुझें पुण्य कर्म। काय वर्णूं १९९
यम म्हणे जशी। तान्हेल्यासी सुधा
तुझी वाणी बुधा। मज तशी॥२००॥
पती विना इष्ट। वर माग तिजा ॥
पर मागती जा। श्रमी न हो॥२०१॥
सती म्हणे ताता। दे औरस शत ॥
पुत्र धर्मरत। वंशकर ॥ २०२ ॥
यम म्हणे शुचि। व्रतारंभरते ॥
आते शंभर ते। पहाशील ॥२०३॥
स्वस्थाना जा शीघ्र। दूर तूं आली-

स ॥ श्रमी कीं झालीस । बाढ वेळ ॥ २०४ ॥ साध्वी म्हणे आहे। पतिसंनिधान ॥ अतिसंनिधान । सुखाचें हें ॥ २०५ ॥ तुझा उत्पादक । विश्व भासविता ॥ देव हा सविता । जगदात्मा ॥ २०६ ॥ अत्यंत हित तूं । सम पुण्यकाम ॥ सत्य तुझें नाम । धर्मराज ॥ २०७ ॥ फळतो दगड । धरितां विश्वास । हें आहे विश्वास । अवगत ॥ २०८ ॥ मग संतीं दृढ । ठेऊनि विश्वास ॥ सोडिला निश्वास । उष्ण कोणीं २०९ यम म्हणे बाई । धन्या तूं सुशीला ।

आलीस कुशीला। जिच्या तीही २१०
दिलें त्वां सुख हें। वर्णवे दान न ॥
वर्ण वेदानन। व्यालें असे ॥ २११ ॥
तुझ्या शब्दामृता। तृप्तीच्या हेतूला ॥
प्राशून हे तूला। कर्ण गाती २१२ प-
तीविना वर। मागें चवथा न ॥ मागें
चव थान। ठेवी पानीं ॥२१३॥ ती
सती मुरली। गाय कृष्णसार ॥ का-
य कृष्णसार। यमधर्म ॥ २१४ ॥
चित्राश्वाची जाया। योग्य पुत्रश-
त ॥ पावो सतीव्रत। स्वस्थ रा-
हो ॥ २१५ ॥ म्हणे दिले पुत्र।
शंभर हिताचे ॥ दंभरहिताचे। ध-

र्मे जैसे ॥ २१६ ॥ आतां तरी बा-
ई । सावित्री परतें ॥ भूमीला भर
तें । झालें शव ॥ २१७ ॥ साध्वी
म्हणे देवा । जी धर्मसंतति ॥ इच्छि-
ती संत ती । धर्मासाठीं ॥ २१८ ॥
संतांची शाश्वत । धर्मीं चित्तवृत्ति ॥
अधर्मी प्रवृत्ति । स्वप्नीं नसे ॥२१९॥
संतांची संसार । नदीनौका कथा ॥
त्या संतांसी व्यथा । कासयाची २२०
साधुसंत गंगा- । यमुनांचे ओघ ॥
हा संगम मोघ । कधीं नाहीं २२१
संतांपासूनिया । संतां भय झालें ॥
असें काना आलें । नाहीं कधीं२२२

संत चालविती । सत्यें तरणीतें ॥ त-
पें धरणीतें । धरिताती ॥ २२३ ॥
किंबहुना संत । सर्वांचीही गति ॥
संत मुक्तिपति । संत ज्ञान ॥२२४॥
व्रत चालवी तें । एक संतराय ॥ ना-
में अंतराय । जाती दूर ॥ २२५ ॥
प्रसाद शाश्वत । अर्थ बहुमान ॥
यांचें मूलस्थान । संत तुम्ही॥२२६।
यम म्हणे वाणी । नव्हे बोलकी
ती ॥ बाई बोल किती । तुझे वर्णू
॥ २२७ ॥ तुज वर्णावया । नाहीं
मज शक्ति ॥ तुझे ठायीं भक्ति ।
माझी झाली ॥ २२८ ॥ पांचवा अ-

दुभुत । वर महाभागे ॥ माग न हा-
भागे । वर देतां ॥ २२९ ॥ सावि-
त्री म्हणे या । देवा वरदान ॥
तुझें वरदा न । व्यर्थ व्हावें ॥२३०॥
स्व सत्य सांभाळा । मत्पति वांचवा॥
द्या वर पांचवा । हाचि मज ॥२३१॥
स्वर्गी भाग्यसुख । शतपुत्र जिणें ॥
नको पतीविणें । मज देवा ॥२३२॥
वांचवावा माझा । भर्ता सत्यवंत ॥
देवा सत्यवंत । त्वांही व्हावें ॥२३३॥
शतपुत्रवर । दयेनें देऊनि ॥ पती-
ला घेऊनि । कसा जासी ॥२३४॥
धर्म म्हणे बाई । प्रताप हा भला ॥

जिंकिलें त्वां मला। पतिव्रते ॥२३५॥
मार्कंडेया जशी । तारी शंभुभक्ति ॥
तशी तुझी शक्ति । सत्यवंता ॥२३६॥
बाई स्यां तुझा हा । भर्ता के-
ला मुक्त ॥ याशीं तूं हो युक्त । चि-
रकाळ ॥ २३७ ॥पतीसह राज्य।
चार शत वर्षे ॥ करिशील ह-
र्षें । धर्मन्यायें ॥ २३८ ॥ षड्रि-
पु होतील । नत पतिव्रते ॥ न
तप तीव्रते । साहतील ॥ २३९ ॥
ऐसें सांगोनि तो । गुप्त झाला धर्म ।
प्रकटलें शर्म । सतीमर्मीं ॥ २४० ॥
आली जेथें होतें । वनीं कलेवर ॥

मनीं केले वर । चमत्कार ॥२४१॥
वैसे घेऊनि तें । शिर मांडीवर ॥
चिर मांडी वर । सुश्रूषा ती ॥२४२॥
संज्ञा पावोनि तो । उघडी नयन ।
करूनि शयन । उठलासा ॥२४३॥
वाटे जाऊनि तो । आला परदेशा ॥
सती वरदेशा । मनीं वंदी ॥२४४॥
पदरें पुसूनि । मुख घाली वारा ॥
जपे सती दारा । मातेपरी ॥२४५॥
म्हणे कांते तुज । चिर भागविलें ॥
कां न जागविलें । तुवां मज २४६
पुरुष ओढीत । होता मज श्याम ॥
तो कोठें तन्नाम । काय सांग ॥२४७॥

पाहिला स्वप्नीं कीं । सत्य तो दे-
खिला ॥ म्यां मनीं लेखिला । स-
त्य काळ ॥ २४८ ॥ सावित्री म्हणे
तो । पापपुण्यकर्म ॥ फळदाता धर्म- ।
राज देव ॥२४९॥ गेला स्व-
स्थानाला । आम्हीं जाऊं चला ॥
तुम्ही न उचला । भार कांहीं २५०
रात्र झाली गुरु । चिंतेला वहात ॥
वाटेला पहात । असतील ॥२५१॥
निजलों त्वदंकीं । बहु घोरत मी ॥
तसा घोर तमीं । देखिला तो २५२
स्वप्न कीं सत्य हें । कसें काय सांग ॥
आठवितां अंग । थरारतें ॥२५३॥

साध्वी म्हणे तुम्हीं । न धरावी व्यथा ॥ सांगेन हे कथा । उद्यां सारी ॥ २५४ ॥ सत्यवंत म्हणे । अंधकार दाट ॥ वनीं कशी वाट सांपडेल ॥ २५५ ॥ सती म्हणे शुष्क । वृक्षीं तो दहन ॥ दिसतो गहन । प्रकाशी तो ॥ २५६ ॥ उपाय दिसाया । वाट भली तमीं ॥ चला अलात मी । हातीं घेत्यें २५७ अथवा नसेल । शक्ति तरी राहूं ॥ प्रातःकाळीं पाहूं । गुरूंप्रति ॥२५८॥ सत्यवंत म्हणे । वृद्ध मायबाप ॥ पावतील ताप । वियोगानें ॥ २५९ ॥

घडींत शतदां । मज स्मरतील ॥ शोकें मरतील । निःसंदेह ॥२६०॥ मी शोकें हा प्राण । सोडीन हें जाण ॥ सत्य तुझी आण। वहा-तसे ॥ २६१ ॥ ऐसें म्हणोनि तो। पितृभक्त रडे ॥ सत्यवंत पडे । स्त्रीच्या गळां ॥ २६२ ॥ सा-वित्री म्हणे त्यां । स्वधर्म जो-डिला ॥ असेल सोडिला । दुष्ट मा-र्ग ॥ २६३ ॥ तरी यांसी त्यांसी । सुखें भेटी घडो ॥ संकट न पडो । कोणां कांहीं ॥२६४॥ सत्यवंत म्ह-णे । कसें तरी करी ॥ सावित्री

उद्धरी । दुःखांतूनि ॥ २६५ ॥ उ-टोनि प्रथम । स्वकेश सांवरी ॥ सा-वित्री त्यावरी । सत्यवंता ॥ २६६ ॥ चित्राश्व तो तिच्या । बळें उभा राहे ॥ पात्राकडे पाहे । फळांच्या तो ॥ २६७ ॥ सती म्हणे येव्हां । वृक्षीं राहो पात्र ॥ परशु हा मात्र । मीच घेत्यें ॥ २६८ ॥ जेणें सर्प शुं-डा । कार तो तोडावा ॥ पतीचा तो डावा । रम्य बाहु ॥ २६९ ॥ वाहे वामस्कंध । आपुल्या ती सती ॥ स्व-दक्षानें पति । आलिंगुनि ॥ २७० ॥ निघाली तों वनीं । चंद्रिका दिवटी

॥ होऊनि निवटी । अंधकारा ॥२७१॥
एरीकडे आली । द्युमत्सेना दृष्टि ॥
दिसे सर्व सृष्टि । यथापूर्व॥ २७२ ॥
गेलें अंधपण । नुमजला तो हें ॥
झाला पुत्रमोहें । पुन्हां अंध॥२७३॥
भार्येसह नृपें । सर्वांही ऋषींसें ॥ पु-
शिलें ऋषितें । जसें पाणी ॥ २७४॥
शोधूनि सस्त्रीक। भूप तो रडला ॥
मूर्च्छित पडला । पुत्रशोकें ॥२७५॥
करिती विलाप । जेव्हां ते दंपती ॥
समाधि संपाति । ब्राह्मणांचे ॥२७६॥
मिळाले पावोनि । ताप सखेद हा ॥
तापस खेद हा । निवाराया॥२७७॥

स्त्रीसह तो राजा । आश्रमांत नेला॥
त्यांहीं बोध केला। परोपरी ॥२७८॥
सुवर्चा गौतम । दाल्भ्य मुनिराज ॥
धौम्य भरद्वाज । आपस्तंब ॥२७९॥
म्हणती संताप । हा जाईल क्षणें ॥
उत्तम लक्षणें । सावित्रीचीं ॥२८०॥
सुचविते दृष्टि । लाभ, महोदया ॥
ऐका अहो दया । देवाची हे ॥
॥ २८१ ॥ घरीं ब्राह्मणांच्या । व-
चनीं विश्वास ॥ बा उष्ण निश्वास ।
सोडूं नको ॥ २८२ ॥ ऐसें जों बो-
ले ती । मंडळी मावळी ॥ तों सा-
ध्वी पावली । पतीसह ॥२८३॥ भू-

पाहूनि बहु । ब्राह्मण हर्षले ॥ मे-
घसे वर्षले । आशीर्वादें ॥ २८४ ॥
राजासी ह्मणती । आलें कीं प्रत्यया
॥ बोलतो सत्य या । मुखें वेद ॥
॥ २८५ ॥ पुसती वत्सा कां ।
विलंब लागला ॥ नृपाळ भागला ।
चिंताभारें ॥ २८६ ॥ शिरीं बाधा
झाली । फोडितां लांकडें ॥ निज-
लों सांकडें । पडलें हें ॥ २८७ ॥
नाहीं जागविलें । इणें घोर तमीं ॥
सुखें घोरत मी । निजलोंच ॥२८८॥
गौतम म्हणे बा । बोलिलासी खरें
॥ परी तत्व बरें । नेणसी तूं ॥२८९॥

अकस्मात दृष्टीचा । लाभ असा अं-
धा ॥ राया सत्यसंधा । द्युमत्सेना ॥
॥ २९० ॥ सावित्री बाई तूं । सांग
सर्व वृत्त ॥ समस्तांचें चित्त । तृप्त
करी ॥ २९१ ॥ ती सती तें सर्व ।
वृत्त आयकवी ॥ तेव्हां काय कवि।
विसरले ॥ २९२ ॥ करिती ते बंदी-
सम स्तव मुनि ॥ समस्त वमूनि ।
मान विष ॥ २९३ ॥ अश्वपतिकन्या।
सावित्री हे धन्या ॥ अशी नाहीं
अन्या । पतिव्रता ॥२९४॥ सावित्रीनें
दोनी । कुळें उद्धरिलीं ॥ कीर्तीनें ह-
रिलीं । पापदुःखें २९५ स्तवूनि पुसू-

नि । मनांत नमूनि ॥ सनातन मुनि । स्थळा गेले ॥ २९६ ॥ प्रातः काळीं प्रजा । येऊनि प्रणति ॥ करूनि म्हणती द्युमत्सेना ॥२९७ ॥ तुमच्या प्रधानें । मारिला अराति ॥ सनाथा करा ती । राजधानी ॥२९८ ॥ न्या-वयासी आलें । चतुरंग सैन्य ॥ शत्रुपक्षीं दैन्य । दुःख गेलें॥ २९९ ॥ गौतमादि सर्व । तपोधन वंदी॥ प्रेमें होय बंदी । द्युमत्सेन ॥ ३०० ॥ करी मुक्तकरी । सम स्तवनातें ॥ समस्त वनातें । प्रदक्षिणा ॥ ३०१ ॥ बैसे राजपदीं । होय पूर्ण काम ॥ तो

जसा श्रीराम । अयोध्येंत ॥३०२॥
सावित्रीची कथा । सज्जनांसी तशी॥
मयूरास जशी । मेघमाला ॥३०३॥
सावित्रीच्या कथा । गातील ज्या
स्त्रिया ॥ होतील त्या प्रिया । बहु
मान्या ॥ ३०४ ॥ सावित्री सावि-
त्री । असें जे म्हणती ॥ कल्याणा
गणती । नाहीं त्यांच्या ॥ ३०५ ॥
सावित्री स्मरण । सावित्री पूजन ॥
सावित्री कीर्तन । सत्यसार॥३०६॥
पतिव्रता तरे । पतिव्रता तारी ॥ प-
तिव्रता नारी । जगदंबा ॥ ३०७ ॥

सावित्रीगीत समाप्त.

# मोरोपंती रुक्मिणीगीत.

कुरुक्षेत्रीं येतां । सूर्यग्रह पर्व ॥ स्ना-
ना आले सर्व । यदु कुरु ॥ १ ॥द्रु-
पदाची कन्या । सद्गुणाची खाणी ॥
पांडवांची राणी । होती जेथें ॥ २ ॥
श्रीकृष्णाच्या भार्या । साष्ट शत सो-
ळा ॥ सहस्रही गोळा । झाल्या तेथें ॥
॥ ३ ॥ द्रौपदी सर्वांचा । करी बहु
मान ॥ त्यांचें देहभान । उरों ने-
दी ॥ ४ ॥ रुक्मिणीस ह्मणे । सांग
निज लग्न ॥ कथा मन मग्न । सु-
खी होऊं ॥ ५ ॥ रुक्मिणी म्हणे

हो । असो स्तव यथा- ॥ मति लग्न-
कथा ॥ सांगेन मी ॥ ६ ॥ विदर्भ
देशांत । कुंडिन नगरीं ॥ भीष्मका-
च्या घरीं । जन्म माझें ॥७॥ माझ्या
जननीचें । नाम शुद्धमती ॥ जिचा
भाव पति । महेश्वर ॥ ८ ॥ बंधु मा-
झे पांच । वडील अवघे ॥ आहेत
चवघे । ताताधीन ॥ ९ ॥ देवब्रा-
ह्मणांचा । भक्त माझा बाप ॥ ज्या-
ला स्वप्नीं पाप । ठावें नाहीं. ॥१०॥
रुक्मिणी हें माझें । माहेरचें नाम ॥
जाती पुष्प दाम । भावाचें मी ॥
॥ ११ ॥ रुक्मि ज्येष्ठ बंधु । मोठा

अहंकारी ॥ घरीं दारीं भारी । ते-
ज त्याचें ॥ १२ ॥ स्वामींचा म्यां
साधु- । मुखें बडीवार ॥ आयकिला
फार । बाळपणीं ॥ १३ ॥ कारण
आनंद । सिंधुमज्जनाचें ॥ येणें स-
सज्जनांचें । मज होय ॥ १४ ॥
श्रीकृष्ण गुणांची । लागलीच गो-
डी ॥ पळही न सोडी । मन माझें॥
॥ १५ ॥ तात म्हणे द्यावी । संसार
चैद्याला ॥ देईन चैद्याला । दादा
म्हणे ॥ १६ ॥ दादापुढें कांहीं । न
चाले बापाचें ॥ तें फळ पापाचें ।
माझियाची ॥ १७ ॥ आणविला चै-

ध । धरियेलें लग्न ॥ झालें चिंता-
मग्न । मन माझें ॥ १८ ॥ चिंता नाहीं
कळों । दिली त्यां जनांत ॥ योजि-
ले मनांत । सात श्लोक ॥ १९ ॥
लिहिली पत्रिका । आपुल्याच हातें॥
संकट महा तें । काय सांगूं ॥ २० ॥
सुदेव ब्राह्मण । विनविला आर्य ॥
पाठविला कार्य । साधावया ॥ २१ ॥
पत्रिका घेऊनि । गेला द्वारकेला ॥
तेणें फार केला । श्रमी देह ॥ २२ ॥
ब्राह्मणाची भीड । स्वामींस पडली ॥
तरीच घडली । मज सेवा ॥ २३ ॥
विप्र हस्तीं देती । हात पुण्यश्लोक ॥

सात पुण्य श्लोक । वाचितांचि॥२४॥
पूर्ण अनुग्रह । स्मितें जाणविला ॥
रथ आणविला । त्याचि वेळे॥ २५ ॥
स्वरथीं प्रथम । चढवूनि विप्र ॥
माझे स्वामी क्षिप्र । आरूढले॥२६॥
आले गांवें एका । रात्रींत शंभर ॥
स्वामी विश्वंभर । दयासिंधु ॥ २७ ॥
द्विज गेल्यावरी । शिशुपाळ आला॥
चिंता ज्वर झाला । मला भारी ॥
॥ २८ ॥ माय दे लावूनि । देहाला
हळद ॥ हे हलाहलद । न तो पा-
प ॥ २९ ॥ करूनि भलतें । एक
मिष वाटे ॥ पाहें विष वाटे । अन्न-

पान ॥ ३० ॥ पुसतां सांगें मी ।
अश्रु हेतु तेल ॥ उत्तरीं गुंतेल । न-
व्हे कधीं ॥ ३१ ॥ लग्न पूर्व दिनीं ।
वृष्णी बळपूर्ण ॥ होऊनियां तूर्ण ।
हरावया ॥ ३२ ॥ ऐसें जें लिहोनि ।
पाठविलें होतें ॥ आठविलें हो तें ।
शतदां म्यां ॥ ३३ ॥ न आले त्या
दिवशीं । मध्यें रात्रिमात्र ॥ चिंता-
ज्वरें गात्र । तापविलें ॥ ३४ ॥ त्या-
रात्रीं लागला । नाहीं माझा डो-
ळा ॥ प्राण कंठीं गोळा। झाले होते॥
॥ ३५ ॥ भक्तचिंतामणि । गौरी-
हर परी ॥ हसल्यें त्यावरी । शत-

दां मी ॥ ३६ ॥ मी म्हणें कपाळीं । हा नवरा जीवा ॥ हा नव-राजीवा । मल नेत्रा ॥ ३७ ॥ कृष्णास दे कीं हे । तनु पावकास ॥ अंबे पाव कास । घालूनियां ॥ ३८ ॥ वाहीन मी नित्य । श्रीशंकरा बेल ॥ विशंक रावेल मन पायीं ॥ ३९ ॥ देईन मी नित्य । नवें सदा दानें ॥ नवस दादानें । किती केले ॥ ४० ॥ काय करावें त्या । सज्जनें वाडवें ॥ मदैव आडवें । झालें वाटे ॥ ४१ ॥ जाणो पत्रिकेंत । लिहितां चुकल्यें ॥ तरीच मुकल्यें । महासुखा ॥ ४२ ॥ धा-

डिला चोरोनि । स्वभावा लाखोटा॥ स्वभावाला खोटा । कोण म्हणे ॥ ४३ ॥ न पावावें हें तों । त्यांची नव्हे रीति ॥ न ते अव्हेरीति । वि-नवितां ॥ ४४ ॥ ऐसें नानापरी । चिंतेंत पडल्यें ॥ दुःखें मी रडल्यें सारी रात्र ॥ ४५ ॥ जों ऐसें मन्म-न । चिंतेंत राहाटे ॥ स्फुरला प-हाटें डावा बाहु ॥ ४६ ॥ स्फुरे ने-त्र नाशी । सर्व ताप डावें ॥ सर्वथा पडावें । सुखी येणें ॥ ४७ ॥ हर्षलें कांहीं तों । सुदेव देखिला ॥ तो वि-प्र लेखिला । महादेव ॥ ४८ ॥

तो म्हणे आणिला । आला वासु-
देव ॥ हा लावा सुदेव । वाटे शीघ्र
॥ ४९ ॥ म्यां त्याच्या चरणीं । ठे-
विलें मस्तक ॥ तेणेंही हस्तक । मा-
झ्या माथा ॥ ५० ॥ त्या प्राणदा-
त्याला । काय म्यां अर्पावें ॥ अमृता
तर्पावें । कोणें रसें ॥ ५१ ॥ जें जें दि-
लें तें ते । सद्गुरूला अल्प ॥ वंदनाचि
कल्प । तरु पूजा ॥५२॥ ज्यांला भक्त-
त्राण । दुष्ट दंड पाठ ॥ आले पा-
ठोपाठ । भावोजीही ॥ ५३ ॥ भा-
री बळभद्र । भावोजींचें सैन्य ॥ ये-
तां आलें दैन्य । चैद्यादिकां ॥५४॥

सीमांत पूजन । केलें जनकानें ॥ जसें
जनकानें । मिथिलेंत ॥५५॥ उतरले
प्रभु । कुंडिनाबाहेर ॥ हर्षलें माहेर ।
दादाविणें ॥५६॥ अंबिकेला न्यावी ।
नवरी बाहेरीं ॥ हा माझ्या माहेरीं ।
कुळधर्म ॥ ५७ ॥ मज रक्षावया ।
कटकाचा कोट ॥ केला वाटे लोट ।
सिंधूचा तो ॥ ५८ ॥ या कन्या-
रत्नाला । केली सेना पेटी ॥ अं-
बिकेच्या भेटी । नेते झाले ॥५९॥
जगदंबेची त्यां । पूजा केली भावें ॥
कार्य सिद्ध व्हावें । न कां मग ॥६०॥
उजवा अशोक । प्रसाद मागतां ॥

चरणां लागतां । दिला मज ॥६१॥
प्रसाद घेऊनि । करूनि नमन ॥
तेथूनि गमन । जसें केलें ॥ ६२ ॥
जे मज भोंवते । होते उभे मेले ॥
अंबेनें ते केले । वेडे सर्व ॥ ६३ ॥
गळालीं भल्यांच्या । हातींचीं हात्यारें
॥ पळांत मातेरें । झालें त्यांचें ॥६४॥
न गणिले रथ । गजानिका गदा-॥
ग्रजांनीं कागदा । मान दिला ॥६५॥
प्रकटले स्वामी । लाजल्यें मी बाळा॥
सखी म्हणे माळा । आधीं घाली
॥ ६६ ॥ ज्यांच्या तेजें रवी । शशि
माळवले॥ ते ध्याया लवले । माळा

माझी ॥ ६७ ॥ धरूनियां करीं । स्यंदनीं वाहिलें ॥ हें प्रेम पाहिलें । कोठें कोणीं ॥ ६८ ॥ बैसवूनि अंकीं । उराशीं धरिलें ॥ मज उद्धरिलें । चिंतंतूनि ॥ ६९ ॥ मला नेतां वीर । एकही न बोले ॥ वाटले ते कोल्हे । सिंह स्वामी ॥ ७० ॥ त्या कटक कोटा । स्वर्ग मज सुधा ॥ म्हणा चक्रायुधा । पक्षीराज ॥७१॥ यापरी हरूनि । मज दूरवर ॥ आले शूरवर । धनी माझे ॥ ७२ ॥ पावले दुर्जन । असा वध हो ते ॥ असावध होते । घडीभरी ॥ ७३ ॥

मग मज नेलें । असें त्यां कळलें॥
वदन मळलें । अपयशें ॥ ७४ ॥
ते दुष्ट म्हणती । तापोनि कोपोनें॥
हरिली गोपानें । वन्या कीर्ति ॥७५॥
जिंकोनियां यदु । नंदनास मज॥
मंद ना समज । हरूं आले ॥७६ ॥
शाल्व जरासंध । चैद्य शिशुपाळ ॥
धांवले भूपाळ । रणासाठीं ॥ ७७ ॥
योजूनि स्वामीला । गट करायाचें ॥
कटक रायाचें । गांठीं घाली ॥७८॥
स्वामीनीं पावतां । भयें तनु कंपा ॥
केली अनुकंपा । मजवरी ॥७९॥ बो-
लिले कोमलें । आंग कांपतीस॥ सांग

कां पतीस। पावोनही ॥ ८० ॥ शत्रु भयें झाला। प्रकट कांप हा ॥ स्वकट-का पहा। भिऊं नको ॥८१॥ चैद्यादि तृणाच्या । पहा या दवातें ॥ अहा यादवांतें कोणसाहे ॥ ८२ ॥ फिरले आमुचे । बळदेव दादा ॥ तेजें सिंह-नादा । करितात ॥ ८३ ॥ भेदितील तेजें। पर्वता पहा तें ॥ सर्व ताप हातें । हरितील ॥ ८४ ॥ यांच्या जळतील । तेजें पळतील ॥ वैरि मळतील । अकीर्तीनें ॥ ८५ ॥ केला नसे कोणी। रामासम रण ॥ रामास मरण । भय नाहीं ॥ ८६ ॥

यांचें देवांनीही । हळ नवसावें ॥
पळ न वसावें । पुढें काळें ॥८७॥
ऱ्यालीस कां अहा । मुग्धे स्वस्थ
रहा ॥ चमत्कार पहा । संगराचा
॥ ८८ ॥ या स्वामींच्या बोलें । सा-
ध्वस उडालें ॥ आनंदीं बुडालें । मन
माझें ॥ ८९ ॥ पाहें तों उठले ब-
ळाचे सागर ॥ मुसळ नांगर । घे-
ऊनियां ॥ ९० ॥ त्या स्वल्प बाव-
न्न । वर्ण बाखाणाया ॥ अर्णवा खा-
णाया । समर्थ ते ॥ ९१ ॥ स्वर्गज
होय कां । न कोहळा हळा ॥ नको
हाळाहळा । गंध ज्याचा ॥ ९२ ॥

घटजी शोषाया । तप नदीपान ॥
तपन दीपा न । लोपवील ॥ १३ ॥
झाले और्वे पर । बळ पारावारा ॥
बळ पारावारा । किती जाणें ॥१४॥
पर सेनार्णवीं । बळ मंदराग ॥ खळ
मंद राग । त्याचा येतो ॥ १५ ॥
वाहिलीं क्षोणितें । खणीत शोणितें॥
वर्णवें कोणीं तें । महा युद्ध ॥१६॥
वीर अभिमुख । प्रहारें जे मेले ॥
अप्सरांनीं नेले । वरूनि ते ॥ १७ ॥
नाचले त्या रण । रंगांत कबंध ॥
कीं पातकबंध । मुक्त झाले ॥ १८ ॥
विस्तार तूं पूसो । नको टिके सरी॥

न कोटि केसरि। बळ यांच्या॥९९॥
वैरि वीर बहु। रणांत गळाले॥
उरले पळाले। मृत्युभयें॥ १०० ॥
जयश्रीचा लाभ। सर्वांही यादवां॥
किती तीं यादवा। वैरि तृणें॥१०१॥
दादानें देखिले। स्वरक्तें रंगले॥
जे रणीं भंगले। चैद्यादिक॥१०२॥
म्हणे पाहा कैशी। सोडवितों क-
न्या॥ हे कार्य मी अन्या। सांगों
नये॥ १०३ ॥ यादवांच्या रक्तें।
क्षोणीस न्हाणितों॥ भगिनी आ-
णितों। घडीमाजीं॥ १०४ ॥ घ-
रीन चोराला। त्रैलोक्य धुंडीन॥

नातरी कुंडिन। पाहे न मी॥१०५॥
जिंकावया केली। तया प्रतिज्ञा ते॥
जयाप्रति ज्ञाते। उपासिती॥१०६॥
अक्षौहिणी सैन्य। घेऊनि धावला॥
क्षणांत पावला। दादाराय॥१०७॥
जयाच्या पायांला। भावीक लाग-
ती॥ गावी कलागती। त्याशीं
बरी॥१०८॥ दादानें रथासी।
रथ मेळविला॥ क्षण खेळविला।
प्रभूंनीं तो॥१०९॥ स्वामींचें जें
तेज। अजित रणीं तें॥ अजी त-
रणीतें। तापवील॥११०॥ न
मर्में खंडिलीं। कोदंडकवचें॥ तो

दंडक वचें । सांगवेना ॥ १११ ॥
स्वामींची दुर्जनीं । उग्रता बाहेर ॥
मानस माहेर । करुणेचें ॥ ११२ ॥
विरथ विशस्त्र । दादा केला भग्न ॥
मग खड्ग नग्न । वधावया ॥ ११३ ॥
होता बंधु तेज । मंद कालवलें ॥
नंदका लवलें । मन शिर ॥ ११४ ॥
ऐकिली न नत । घात लीला जुनी ॥
घातली लाजूनि । पायीं मिठी ११५
सोडोनियां कोप । सकळ वळले ॥
न कळवळले । कोणा आर्ती ११६
ठेऊनि नंदक । ध्वजाशीं बांधिलें ॥
खावें जें रांधिलें । जैसें स्वयें ११७

भावाची सांगों मी । काय काय शोभा ॥ नायका यशोभा । यदूंच्याचि ॥ ११८ ॥ स्वामींनीं दादाची । दादाच्याचि दोषें ॥ विटंबिली रोषें । तनु जैशी ॥ ११९ ॥ विटंबिती जैसा । भावोजीही कोपें ॥ दोषांसही सोपें । चरित्र हें ॥१२०॥ मुक्त केला दादा । भावोजींनीं आंगें ॥ थोरपण सांगें । असें कोठें ॥ ॥ १२१ ॥ ज्याच्या भक्तिरसें । भुलविला भर्ग ॥ केला तुच्छ स्वर्ग । सुधाभोग ॥ १२२ ॥ ज्या साठीं ब्रह्मादि । सुर सदा दास ॥ सुरस

दारास । रुचेना तो ॥ १२३ ॥ ते-
थेंचि राहिला । न गेला कुंडिना ॥
कोणीका धुंडिना । असा नाहीं ॥
॥ १२४ ॥ माझा निववीला । भा-
वोजींनीं खेद ॥ यांचा बोल वेद ।
भेद नाहीं ॥ १२५ ॥ श्रीमूर्ति श्री-
गंगा । या देहा ओहळा ॥ स्वी-
कारी सोहळा । पुरवाया ॥ १२६ ॥
द्रौपदी बाई हे । माजी लग्नकथा ॥
स्वामी मनोरथा । पुरविती ॥१२७॥
नाशी कामक्रोध । लोभ पाप व्य-
था ॥ स्वयंवर कथा । रुक्मिणीची
॥ १२८ ॥ लावी धर्म न्याय । भक्ति

ज्ञान पया ॥ स्वयंवर-कथा। रुक्मि-
णीची ॥ १२९ ॥ भेटवी देऊनि ।
प्रेम पक्षिरथा ॥ स्वयंवर-कथा ।
रुक्मिणीची ॥१३०॥ मयूरासी वर्षा ।
सज्जना हे तथा ॥ स्वयंवर-कथा ॥
रुक्मिणीची ॥ १३१ ॥

रुक्मिणीगीत समाप्त.

REFBK-0000283